नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/01/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. भिवापूर :- अंतर्गत १७ किमी अंतरावर मालेवाडा येथे दिनांक २२/०१/२०२४ चे ११.३० वा. दरम्यान यातील आटो क्र. एम. एच- ४०/१८३४ चा चालक **आरोपी नामे- गणेश राजेराम गजभीये, वय ३५ वर्ष, रा. कवडशी बरड ता. भिवापूर** याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून उमरेड कडून ऑटो मध्ये सवारी भरून कवडशी बरड येथून भिवापूर येथे दवाखान्यात जात असता मालेवाडा बसस्टॉप जवळ ऑटो समोर एक ॲक्टीवा आल्याने त्यांना वाचविण्याकरीता कट मारली असता ऑटो पलटी झाल्याने ऑटोमध्ये बसलेला **मृतक नामे- रंजीत परसराम मेश्राम, वय २७ वर्ष, रा. कवडशी बरड** त्यांचे डोक्याला मार लागला असल्याने त्याचा उपचार मेडीकल कॉलेज नागपूर येथे केला असता उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- पोहवा प्रफुल माहुरे पोस्टे भिवापूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी, सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर अपघातस्थळी पोलीस उपनिरीक्षक सडमेक पोस्टे भिवापूर यांनी भेट दिली असुन आरोपीस सुचनापत्रावर रिहा करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सडमेक पोस्टे भिवापुर मो. नं. ९८३४३१२७९५ हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :- अंतर्गत ३० किमी अंतरावर कळमना ता. उमरेड येथे दिनांक २३/१२/२०२३ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे- मधकुर डोडु सोनटक्के, वय ८० वर्ष, रा. गंगापुर वार्ड क्र. ०५ उमरेड जि. नागपुर हे दि. २३/१२/२०२३ रोजी तितुर ता. कुही येथे पुजापाठ करण्याकरीता गेले होते परत येताना कळमना बस स्टॅड येथुन बसने उतरून पायदळ कळमना फाटा रोड क्रॉस करीत असताना उमरेड ते नागपुर रोडने येणारी स्वीफ्ट कार एम. एच.- ४९/बी- ५५१७ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन धडक दिल्याने मृतकाला जबर मार लागल्याने मरण पावले. यावरून प्रथम पोस्टे कुहीला मर्ग ०१/२०२४ कलम १७४ जाफौ दाखल केले व त्यानंतर चौकशी अहवालावरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात तपासात घेण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे- पोहवा दिलीप लांजेवार पोस्टे कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी कार चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादंवी, सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर अपघातस्थळी पोलीस उपनिरीक्षक हरीहर सोनकुसरे यांनी भेट दिली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हरीहर सोनकुसरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर